RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ५, अंक ६६]　　सोमवार, नोव्हेंबर १८ २०१९/कार्तिक २७, शके १९४१　　[पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक १२९

## प्राधिकृत प्रकाशन

**विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूका**

### जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांजकडून

**अधिसूचना**

क्रमांक गृह/का.१/टे.४/विकाअ/वशी-२१५९/२०१९.—जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा पालघर ह्या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पालघर जिल्ह्यातील २९ व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यत: आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून ५ वर्षांकरिता अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत अस्तित्वात राहील. तसेच जिल्हाधिकारी पालघर यांस विशेष कार्यकारी अधिकारी यांची ही नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतेही कारण न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील.

**१. विशेष कार्यकारी अधिकारी पुढे उल्लेख केलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील :—**

(एक) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती " मानसेवी " असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकारी यांना कोणतेही मानधन/वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

(दोन) विशेष कार्यकारी अधिकारी यांना केवळ कागदपत्रांच्या साक्षांकनाचे अधिकार राहतील व त्यांनी मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय साक्षांकन करू नये. त्यांनी साक्षांकन करताना विहित रबरी शिक्क्यासह सही करून सहीखाली दिनांक नमूद करावा. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करु नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर " सत्य प्रत " म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामांकरिता "विशेष कार्यकारी अधिकारी" म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

(तीन) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने घरावर/दुकानावर/कार्यालयावर स्वतःच्या नावासह " विशेष कार्यकारी अधिकारी " असा फलक लावावा. तथापि, त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर " विशेष कार्यकारी अधिकारी " असा उल्लेख करू नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

(चार) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने " ओळख परेड " तसेच " मृत्यूपूर्व जबानी " यासाठी उपस्थितच राहू नये.

(पाच) विशेष कार्यकारी अधिकारी यांनी " उत्पन्नाचे प्रमाणपत्र " देऊ नये.

(सहा) नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनाचे काम करू नये व सर्व साहित्य संबंधित तहसीलदार यांचेकडे तात्काळ परत करावे. अन्यथा ते पुर्ननियुक्तीसाठी अपात्र ठरतील. नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांने साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

(सात) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती ही नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी राहील व त्यानंतर ती आपोआप संपुष्टात येईल. सदर नियुक्तीच्या कालावधीत त्यांनी कोणतीही नियमबाह्य कृती केल्यास किंवा त्यांचे विरुद्ध गुन्ह्याची नोंद आढळल्यास, त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (bankrupt) जाहीर केले असल्यास, त्याच प्रमाणे कोणत्याही कारणाशिवाय सुद्धा, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती मुदतपूर्व रद्द करण्यात येईल.

**अनुसूची**

| अ. क्र. | तालुका | व्यक्तीचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | पालघर | श्री. रूपेश सुदाम गायकवाड | रा. धुकटण आंबेडकरनगर, पो. गोवाडे, ता. जि. पालघर |
| २ | पालघर | श्री. महेंद्र शांताराम चौधरी | रा. पोफरण, पो. अक्करपट्टी, ता. जि. पालघर |
| ३ | पालघर | श्री. दिपेश सुरेश भोणे | रा. मु. पो. दापोली, ता. जि. पालघर |
| ४ | पालघर | श्री. चिराग किरीट पटेल | रा. युनिक रेसिडेन्सी, अभिनिवास बंगला, बी/१, माहिम रोड, ता. जि. पालघर. |
| ५ | पालघर | श्री. किरण जगन्नाथ मराठे | रा. १०४, तळमजला, एस. के. अपार्टमेंट, आर्यन शाळेमागे, पालघर, ता. जि. पालघर. |
| ६ | विक्रमगड | श्रीम. रत्ना पुरुषोत्तम सातवी | रा. मु. पो. ता. विक्रमगड, जि. पालघर |
| ७ | वसई | श्री. कमलेश दत्ताराम पाटील | रा. दरपाळे (पाळी), भंडारआळी, ता. वसई, जि. पालघर |
| ८ | वसई | श्रीम. संगिता सतीशकुमार चौबे | रा. ए-१०१, साई नेत्रा अपार्टमेंट, ओसवाल नगरी, नालासोपारा (पू.), ता. वसई, जि. पालघर. |
| ९ | वसई | श्री. कमलेश प्रभाकर तळेकर | रा.बी/२०६, देवप्रयाग, बी नाथवाणि पार्क, अल्कापुरी रोड, कैलास दर्शन जवळ, नालासोपारा (पू.), ता. वसई, जि. पालघर. |
| १० | वसई | श्री. ज्ञानेश पांडूरंग पुगांवकर | रा. डी/१०२, अनंत आश्रय को.ऑप.हौ.सो. फेस-१, पहिला मजला, संयुक्त नगर, नालासोपारा (पू.) ता. वसई, जि. पालघर |
| ११ | वसई | श्रीम. जयंती जसुभाई वालंद | रा. एफ-२०४, न्यु अजय अपार्टमेंट, स्टेशन रोड, नालासोपारा (पू.) ता. वसई, जि. पालघर. |
| १२ | वसई | श्री. दिपक कान्हा चौधरी | रा. वर्तक वसाहत, मु. पो. पेल्हार, ता. वसई, जि. पालघर |
| १३ | वसई | श्री. संजय पद्माकर नामखुडे | रा. पेल्हार जाबरपाडा, ता. वसई, जि. पालघर. |
| १४ | वसई | श्री. दिपक राजेंद्रप्रसाद दुबे | रा. जी-२, कृष्णापार्क, पाटणकर पार्क, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर. |
| १५ | वसई | श्री. स्वप्नील दिलीप बने | रा. डी-६०१, वीणी हाईट्स, छेडा मार्ग, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर |
| १६ | वसई | श्री. संजय शांताराम चिपळूणकर | रा. ए-३०१, ब्लु स्कायलाईन को.ऑ.हौ.सो., फुलपाडा रोड, विरार (पू.), ता. वसई, जि. पालघर. |
| १७ | वसई | श्री. मनिष गयाप्रसाद गुप्ता | रा. ११६७, वाण्याचापाडा, पेल्हार, ता. वसई, जि.पालघर |
| १८ | वसई | श्री. विराज श्याम रेवडेकर | रा.बी/२०४, गोकूळ क्लासिक, बोळींज विरार (प.), ता. वसई, जि. पालघर. |

अनुसूची—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १९ | वसई | श्री. जयेश अनिल जोशी | रा. बी/१/१०३, सत्यम लोकप्रभात सोसायटी, बोळींज, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर. |
| २० | वाडा | श्री. प्रकाश नागो पाटील | रा. फ्लॅट नं. २०२, पारिजात अपार्टमेंट, आगरआळी, वाडा, ता. वाडा, जि. पालघर. |
| २१ | वाडा | श्री. संतोष कोंडू पाटील | रा. मु. चिंचघर, पो. कुडूस, ता. वाडा, जि. पालघर |
| २२ | वाडा | श्री. अविनाश वसंत सावंत | रा. आंबिस्ते (जांभळयाचा पाडा), ता. वाडा, जि. पालघर |
| २३ | वाडा | श्री. नितीन तुकाराम घरत | रा. डाकीवली, पो.चाबळे, ता. वाडा, जि. पालघर |
| २४ | वाडा | श्रीम. अर्चना जर्नादन भोईर | रा. बिलावली, पो. खुपरी, ता. वाडा, जि. पालघर |
| २५ | वाडा | श्री. हर्षल हरिश्चंद्र खांबेकर | रा. वाडा-परळीनाका, ता. वाडा, जि. पालघर |
| २६ | वाडा | श्रीम. रंजना कृष्णा भोईर | रा. निंबवली, ता. वाडा, जि. पालघर |
| २७ | तलासरी | श्री. विष्णु सदाशिव कोंढारी | रा. मु. पो. उपलाट (कोंढारीपाडा), ता. तलासरी, जि. पालघर |
| २८ | वसई | श्रीम. मुनमुन अनादि पाल | रा. बी/२०५, विनी रेसीडन्सी, फेज १, हनुमान नगर, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर. |
| २९ | वसई | श्री. आनंद बुधाजी जाधव | रा. भालीवली, पो. खानिवडे, ता. वसई, जि. पालघर. |

पालघर,
दिनांक १८ नोव्हेंबर २०१९.

**डॉ. कैलास शिंदे,**
जिल्हाधिकारी, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.